# जागा १०; इच्छुक ६२

## स्वीकृतसाठी अर्ज भरण्यासाठी महापालिकेत गर्दी; एमआयएमकडून तिघे इच्छुक

### भाजपाकडून २० च्या सूचनेनंतरही ४० जणांची एंट्री

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर महापालिकेतील १० स्वीकृत सदस्य नियुक्तीसाठी आयुक्त कार्यालयात मोठी गर्दी पाहायला मिळाली.१० जागांसाठी ६२ अर्ज दाखल झाले आहेत. भाजपने २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र ४० पेक्षा जास्त जणांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे स्वीकृत नगरसेवकसाठी जोरदार रस्सीखेच असल्याचे चित्र पाहायला मिळाली. भाजपकडून शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर , माजी नगरसेवक जगदीश पाटील यांच्यासह अनेकांनी अर्ज भरले. एमआयएम पक्षाच्या वतीनेही अर्ज दाखल करण्यात आले आहेत. शुक्रवारच्या विशेष सभेत १० जणांची नावे जाहीर होणार आहेत.**





सोलापूर : स्विकृत सदस्यासाठी अर्ज भरायला जाताना रोहिणी तडवळकर तर दुसऱ्या छायाचित्रात एमआयएमकडून अर्ज भरायला जाताना नईम सालार.

महापालिकेच्या नामनिर्देशित म्हणजेच १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना बुधवारी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील इंद्रभुवन इमारतीतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करण्यासाठी मोठी गर्दी दिसून आली. नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी हे अर्ज स्वीकारले. वरिष्ठ लिपिक नितीन गायकवाड यांनी त्यांना सहकार्य केले. सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे. दरम्यान, बुधवारी सकाळी ११.४० वाजता भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह इच्छुक उमेदवारांनी महापालिकेत येऊन स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केले. त्याचबरोबर एमआयएम पक्षाकडूनही इच्छुकानी अर्ज दाखल केले. एकूण ६२ जणांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, यामध्ये भाजपाकडून विविध समाज घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे दिसून येते. भाजपकडून सुमारे ४०० जण इच्छुक होते. त्यांनी पक्षाकडे अर्जही दिले होते. मात्र छाननीनंतर पक्षाने २० जणांना अर्ज भरण्यास सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात ४० पेक्षा जास्तजणांनी अर्ज भरले आहेत.

#### कोणाचेही नाव निश्चित नाही : तडवळकर

भाजप पक्षाकडे स्वीकृत नगरसेवक पदासाठी मोठ्या प्रमाणात इच्छुकांच्या अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना पक्षाने दिल्या आहेत. त्यानुसार माझ्यासह २० जणांनी अर्ज दाखल केले आहेत. येत्या २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत २० पैकी नऊ जणांची नावे निश्चित करण्यात येणार आहेत. सध्या कोणाचेही नाव निश्चित झालेले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिल्यानंतर ती यादी पा लकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे येईल. त्यानंतर २० फेब्रुवारीच्या सभेत ही नावे घोषित करण्यात येतील, असे भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी स्पष्ट केले.

#### या इच्छुकांनी दाखल केले अर्ज

बुधवारी भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर , प्रभाकर जामगुंडे, जगदीश पाटील , शशी थोरात , अक्षय आंजिखाने, श्रीनिवास दायमा, सुधा अळ्ळीमोरे , श्रीकांत घाडगे , जवाहर जाजू, अनुप खंडेलवाल, केतन शहा, वृषाली चालुक्य,पांडुरंग दिड्डी, ॲड. राजन दीक्षित, ॲड. साधना संगवे , सूरज चव्हाण, कृष्णा झंवर, महेश तापडिया, लक्ष्मीकांत दरक, मल्लिनाथ राचेटि, सोमनाथ केंगनाळकर, रुद्रेश बोरामणी , देवेंद्र भंडारे , नागेश भोगडे, सचिन कुलकर्णी, जय साळुंखे, एमआयएमएमकडून नईम सालार, गाजी जहागिरदार, फिरदौस पटेल यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी अपक्ष म्हणून असे एकूण ६२ इच्छुकांनी अर्ज भरले आहेत.

#### एमआयएमतर्फे नईम सालार यांचे नाव : शेख

एमआयएम पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून स्वीकृत नगरसेवकसाठी नईम सालार यांचे नाव अधिकृतरित्या आले आहे. त्यानुसार आम्ही त्यांचा अर्ज भरला आहे. इतर कोणी अर्ज भरला असेल तर आम्हाला त्यांची माहिती नाही, असे एमआयएमच्या गटनेत्या वहिदा भंडाले – शेख यांनी सांगितले. यावेळी या पक्षाचे नगरसेवक उपस्थित होते.

## पक्षाने सांगितल्यास कोणतेही पद सोडण्यास तयार : तडवळकर

**सोलापूर :** स्वीकृत नगरसेवकसाठी पक्षाने अर्ज भरण्याचे सुचित केल्यानंतर मी अर्ज दाखल केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे आमदार आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडे अध्यक्ष पदाचीही जबाबदारी आहे. यामुळे पक्षाने आदेश दिल्यास पद सोडण्यास तयार आहे, असे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी सांगितले.

सोलापूर महानगरपालिका येथील स्वीकृत सदस्य पदावरून सुरू असलेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी स्वीकृत सदस्य पदासाठी अधिकृत अर्ज दाखल केला आहे. त्यांच्याकडे शहराध्यक्षपदही आहे. भाजपमध्ये प्रामुख्याने एक व्यक्ती-एक पद हा नियम मानला जातो. रोहिणी तडवळकर या सध्या शहराध्यक्ष पदाची धुरा सांभाळत असल्याने त्या स्वीकृत सदस्यपदासाठी अर्ज भरतील का, याबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात होते. त्यामुळे त्यांच्या निर्णयाकडे विशेष लक्ष लागले होते. मात्र अखेर त्यांनी स्वीकृत सदस्यपदासाठी अर्ज भरत सर्व चर्चांना विराम दिला. एक व्यक्ती एक पद या नियमानुसार काय निर्णय घेणार या प्रश्नाच्या उत्तरात भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, स्वीकृत नगरसेवकसाठी पक्षाने अर्ज भरण्याचे सुचित केल्यानंतर मी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे पक्षाने आदेश दिल्यास पद सोडण्यास तयार आहे. दरम्यान, यावेळी माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनी यापूर्वी अशोक निंबर्गी हे शहराध्यक्ष असताना ते स्वीकृत नगरसेवकही होते याची आठवण करून दिली.



#### रोहिणीताईंची गरज दोन्हीकडे

रोहिणी तडवळकर या भाजपच्या ज्येष्ठ नेत्या आहेत. त्यामुळे सभागृहातही त्यांची गरज आहे. तसेच त्या शहराध्यक्षपदीही त्यांची गरज आहे. त्यांचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. देवेंद्र कोठे यांच्याबरोबरही ट्युनिंग चांगले जमले आहेत. त्यामुळे या दोन्हीचा विचार करून त्यांना शहराध्यक्षासह स्विकृत नगरसेवकपदीही संधी दिल्याचे बोलले जात आहे.

## स्वीकृत नगरसेवक निवडीतही भाजपचा गोंधळ?

**सोलापूर :** महापालिका निवडणुकीत उमेदवारी आणि एबी फॉर्म वाटपाच्या वेळी निर्माण झालेल्या गोंधळानंतर आता स्वीकृत नगरसेवक निवडीतही भाजपने गोंधळ घातल्याचे दिसून येत आहे. पक्षाने केवळ २० जणांना अर्ज भरण्याच्या सूचना केल्या होत्या. तरी पक्षाचा आदेश धुडकावून ४० जणांनी अर्ज भरला आहे. याशिवाय कोणत्या २० इच्छुकांना अर्ज भरायला सांगितले, त्याची नावेही भाजपने जाहीर केली नाही. त्यामुळे ऐनवेळी अर्ज न भरलेल्यांपैकी कोणाचे नाव जाहीर होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

काही इच्छुकांनी माध्यमांशी बोलताना, आम्हाला आमदार विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांनी अर्ज भरण्यास सांगितले, असा दावा केला. तर ज्येष्ठ नेते पांडुरंग दिंडी यांनी प्रदेश पातळीवरून थेट फोन आल्यामुळे अर्ज भरला, असे स्पष्ट केले. एकीकडे अधिकृत सूचना २० जणांपुरती मर्यादित, तर दुसरीकडे अर्जांची संख्या दुप्पट - या विसंगतीमुळे भाजपमध्ये अंतर्गत संवाद आणि समन्वयाचा अभाव दिसून येत असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. वास्तविक पाहता प्रमुख ९ जणांची नावेच जाहीर केली जातील, असे इच्छुकांना वाटत होते. मात्र ऐनवेळी पक्षाने २० जणांना अर्ज भरण्यास का सांगितले, असे अनेक भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बोलून दाखवले.

## स्वीकृत सदस्यांवरून भाजपमध्ये ऐनवेळी ट्विस्ट

### चर्चेतील नेत्यांनी अर्जच भरला नाही

**सोलापूर :** सोलापूर महापालिका येथे भाजपकडून स्वीकृत सदस्य पदासाठी बुधवारी अर्ज स्वीकृती प्रक्रिया पार पडली. या पदासाठी तब्बल ४० हून अधिक इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून ज्यांची नावे चर्चेत होती, त्या प्रमुख इच्छुकांनीच अर्ज न भरल्याने भाजपमध्ये ऐनवेळी ट्विस्ट निमार्ण झाल्याचे बोलले जात आहे.

स्वीकृत नगरसेवक पदासाठी अविनाश महागावकर, पद्माकर काळे, मनीष देशमुख, ॲड. प्रदीपसिंग रजपूत, मोहन डांगरे या नावांची जोरदार चर्चा होती. बुधवारी हे सर्वजण अर्ज दाखल करतील, अशी राजकीय वर्तुळात खात्री व्यक्त केली जात होती. मात्र प्रत्यक्षात यापैकी एकाही इच्छुकाने अर्ज न भरल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



दरम्यान, नाना काळे हे महापालिका निवडणुकीत पराभूत झाले होते. त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी दिल्यास इतर पराभूत उमेदवार नाराज होण्याची शक्यता होती. त्यामुळे पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. तसेच मनीष देशमुख यांचे नाव ग्रामीण मतदारसंघाशी संबंधित असल्याने त्यांनी स्वीकृत पदासाठी अर्ज न भरल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू होती. एकूणच, अपेक्षित नावांनी अर्ज न भरल्याने भाजपमध्ये अंतर्गत समीकरणे बदलल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता उमेदवारी अर्ज भरलेल्यांपैकी पक्ष कोणाला संधी देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिवजन्मोत्सवाचा उत्साह; शहर शिवमय

### छत्रपती शिवाजी महाराज चौक हजारो महिलांच्या गर्दीने फुलला

**सोलापूर :** आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा....श्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा पाळणा गात हजारो सोलापूरकर शिवभक्त महिलांनी बुधवारी रात्री बारा वाजता न भूतो न भविष्यती' असा शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करून आपल्या लाडक्या राजाला मानवंदना दिली.



छत्रपती शिवाजी महाराज चौकात आजवर अनेक कार्यक्रम झाले. परंतु, मंगळवारी रात्री झालेल्या शिवजन्मोत्सव सोहळ्याने नवा इतिहास घडवला. रात्री दहा वाजण्याच्या सुमाराला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवभक्तांची दाटी झाली होती. पाळणा सादरीकरणाचे यंदाचे हे पाचवे वर्ष आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांची गर्दी झाली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड पासून ही गर्दी पुणे नाक्यापर्यंत गेली होती. तर इकडे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवी पोलीस चौकी पर्यंत महिलांची गर्दी होती.

या गर्दीतून जय जिजाऊ, जय शिवरायचा जयघोष होत होता. शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ राजमाता जिजाऊंचा पुतळा ठेवण्यात आला होता. या पुतळ्याच्या अगदी समोरच सजवून ठेवलेला पाळणा होता. त्यात बाळशिवबांची मूर्ती होती. दूरूनच या पाळण्याचे छायाचित्र टिपण्यासाठी महिलांची धडपड सुरू होती.

रात्री १२ वाजता झुलवा पाळणा.. पाळणा बाळ शिवाजीचा' हे पाळणा गीत सुरू झाले आणि हजारो महिला, शिवभक्तांनी जल्लोष केला. ज्या क्षणाची सर्व जण वाट पाहत होते तो पाळण्याचा कार्यक्रम सुरू झाला. जमलेल्या महिला, मुले टाळ्या वाजवीत पाळण्याच्या गीताला दाद देऊ लागली. फुले उधळू लागली. आकाशात फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली. जय जिजाऊ-जय शिवराय', छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयघोष गगनात दुमदुमला. हवेत भगवा झेंडा गरगर फिरला आणि पुन्हा जय शिवरायचा जयघोष झाला.

यावेळी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे, ट्रस्ट सचिव प्रीतम परदेशी, ट्रस्टी खजिनदार जयवंत शेळके, सदस्य शिवाजीराव गाडगे, दिलीप कोल्हे, पुरुषोत्तम बर्डे, राजन जाधव, नागेश ताकमोगे, महादेव गवळी, विनोद भोसले, प्रभाकर रोडगे, विक्रांत वानकर, ज्ञानेश्वर सपाटे, अनिकेत पिसे, विवेक फुटाणे, बजरंग जाधव, प्रकाश ननवरे, अमोल केकडे, शिवकुमार कामाटी, देविदास घुले आदी उपस्थित होते.

#### यांच्या हस्ते झाला पाळणा सोहळा

सोलापूर जिल्ह्यातील वीरपत्नी देवकी रत्नाकर हडपद, रेखा शावरेप्पा नावी, रत्नाबाई बाबुराव चांदोडे , सुषमा दत्तात्रय माने, यांच्यासह महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शहरातील शिवकन्या संजीवनी ज्योतीराम भोजने, सरोजिनी ज्योतीराम भोजने ,अमृता ब्रह्मदेव ननवरे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील , अतिरिक्त आयुक्त विना पवार , सुषमा घाडगे, यशोदा सुरवसे, सीताबाई भोसले लता फुटाणे, सरोजिनी शिवाजीराव घाडगे मंगलताई दिलीप कोल्हे आधी जास्त पाळणा कार्यक्रम संपन्न झाला.

## पालिकेतील लाड समितीतील वारसदारांच्या नियुक्तीचा प्रश्न ऐरणीवर

### प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी पाठवा: जानराव

**सोलापूर :** सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने लाड समितीतील पात्र वारसदारांना तात्काळ नियुक्ती देण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. याबाबत आयुक्तांकडे निवेदन सादर करून आकृतिबंधात आवश्यक वाढ करून प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणी अध्यक्ष अशोक जानराव यांनी केली आहे.


निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राज्य शासनाने लाड पागे समितीच्या शिफारशी १९९५ पासून लागू केल्या होत्या. मात्र, सोलापूर महापालिकेत त्या अंमलात येण्यास उशीर झाला. त्यानंतर शासन निर्णयानुसार २८ फेब्रुवारी २०२३ रोजी सुधारित तरतुदी जाहीर करण्यात आल्या असून १९९५ ते २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

महापालिकेकडे सुमारे ६५० वारसदारांचे अर्ज प्रलंबित आहेत. राज्य शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार शैक्षणिक पात्रतेनुसार नियुक्ती देणे बंधनकारक आहे. काही अर्जदार बी.टेक., सॅनिटरी इन्स्पेक्टर, डॉक्टर, वकिल, नर्स, बी.ए., एम.ए., एल.एल.बी. पदवीधर आहेत. मात्र, महापालिकेच्या विद्यमान आकृतिबंधात एकही पद रिक्त नसल्याने नियुक्त्या रखडल्या आहेत.

वारसदारांनी अर्ज केल्यानंतर ३० दिवसांत नियुक्ती देणे अपेक्षित असताना दिरंगाई होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. यामुळे संबंधित कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावले आहे. वर्षभरात झाडूवाले, बिगारी, सफाई कामगार अशा केवळ ३० ते ३५ वारसदारांना नियुक्ती देण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे. कृती समितीचे पदाधिकारी अशोक जानराव, शशी शिरसट, लिंबराज जेटीथोर, बाली मडप्पू, बाबा धीरसागर, वेत्ता तुळसे, अजय धीरसागर आदींनी आयुक्तांकडे सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

#### प्रक्रिया संथ गतीने सुरू

लाड समिती प्रकरणात सेवा पुस्तके, ऑडिट, कागदपत्रांची पडताळणी यामध्ये मोठा विलंब होत असल्याची नाराजीही व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित कागदपत्रे मिळविण्यासाठी वारसदारांकडून शुल्क आकारले जात असूनही प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.



"नागपूर महापालिकेने लाड समितीतील वारसदारांसाठी ४५०० पदांची वाढ करून आकृतिबंध मंजूर केला आणि मोठ्या प्रमाणात नियुक्त्या दिल्या आहेत. त्या धर्तीवर सोलापूर महापालिकेनेही तत्काळ निर्णय घ्यावा.

**-अशोक जानराव,** अध्यक्ष कामगार संघटना कृती समिती